क्र•पुविमं/शाखा आय-१/मान्यता
पुणे -४११०१०

दिनांक - ६.११.१९८६

प्रति -
मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका
सिध्देश्वर हायस्कुल
भोसरी - जि. पुणे

SIDHESHWAR HIGH SCHOOL
RECOG. No. SSN/1084/7250/S/MH-SHI-1
DATED 28 SEPT. 1984

विषय - माध्यमिक शाळांना तात्पुरती प्रथम मान्यता व सांकेतिक क्र• देण्याबाबत••

महोदय/महोदया,

मंडळ नियमावली , २८(१) अन्वये आपण या मंडळाची प्रथम मान्यता मिळविण्यासाठी केलेल्या अर्जाच्या संदर्भात आपणास कळविण्यात येते की, सन १९८६-८७ मध्ये होणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेस (मार्च/ऑक्टोबर विद्यार्थी पाठविण्यासाठी आपल्या शाळेस शिक्षण उपसंचालक यांनी घातलेल्या अटींच्या पूर्ततेवर तात्पुरती प्रथम मान्यता व ११.२५० हा तात्पुरता सांकेतिक क्र• इंग्रजी या माध्यमाकरिता देण्यात येत आहे•

शाळेने नोंदणी शुल्काची रक्कम आपल्या गावातील अगर गावानजिकच्या महाराष्ट्र बँकेच्या शाखेत मंडळाच्या खाते क्रमांक X मध्ये भरावी व भरणा केल्याचे पुणे कार्यालयास चलनाच्या प्रतीसह कळवावे•

पुणे विभागीय मंडळाची नाशिक/कोल्हापूर ही दोन उपकार्यालये असून आपली शाळा ---------------- या उपकार्यालयाच्या कक्षेत येत असल्याने आपण खाली नमूद केलेल्या पत्त्यावर परीक्षेसंबंधीच्या सर्व पत्रव्यवहारासाठी समक्ष संपर्क साधावा•

कार्यालयाशी पत्रव्यवहार करताना शाळेचा निर्धारित सांकेतिक क्र• असणे आवश्यक आहे• याची कृपया नोंद घ्यावी•

आपला विश्वासू,

a/Ms/23/88-89
Ma-sh.

POST

"यशवंतराव चव्हाण भवन"
पुणे जिल्हा परिषद, शिक्षणविभाग.
जा.क्रं./शिक्षण/माध्य/ह ४/८८-८९
पुणे-११. दिनांक :- ५.१.१९८९

प्रति,
मुख्याध्यापक, सिद्धेश्वर हायस्कूल
माळशिरस

विषय :- १९८३-८४ या शैक्षणिक वर्षापासून परवानगी दिलेल्या नविन माध्य. शाळांना ५ वी ते ७ वी चे वर्ग सुरु करण्यास परवानगी देणेबाबत.

उपरोक्त विषयानुसार कळविण्यात येते की, शासनाने १९८३-८४ या शैक्षणिक वर्षापासून इ.८वी पासून मान्यता दिलेली आहे. अशा शालेय इ.५ वी ते ७वी चे वर्ग माध्यमिक विभागात सुरु करावयाचे असल्यास सदर बाबतचे प्रस्ताव ३१ मार्च,८९ पर्यंत खालील बाबींची पूर्तता करून त्यानंतरच प्रस्ताव या कार्यालयास सादर करावेत. दि. ३१.३.८९ नंतर आलेल्या प्रस्तावांचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

१) स्थानिक ठिकाणी इ.५ वी ते ७ वी चीप्राथमिक शाळा आहेत किंवा नाहीत असल्यास त्या वर्गांची पटसंख्या
२) जिल्हा परिषद/नगर परिषद शाळेत इ.५ वी ते ७ वी चे वर्ग असताना शाळेत ५वी ते ७ वी चे वर्ग सुरु करण्याची परवानगी देण्याबाबतचे जिल्हा परिषद/नगर परिषद चे "ना हरकत प्रमाणपत्र" प्राप्त करुन प्रस्तावासोबत सादर करावे.
३) माध्य. शाळेत ५ वी ते ७ वी चे वर्ग सुरु करावयाच्या वर्गांसाठी आवश्यक शैक्षणिक व भौतिक सुविधा संस्थेने उपलब्ध करुन दिल्या आहेत काय त्याबाबतची माहिती -- (अ) एकूण वर्ग खोल्या
(ब) शिक्षक नियुक्ती , (क) शाळा नियमित कार्यरहीत रहाणेचे दृष्टिने संस्थेजवळ असलेली शिल्लक रक्कम इ.

वरील सर्व बाबींची पूर्तता करुन ८९-९० या शैक्षणिक वर्षात इ. ५ वी सुरु करण्यासाठी अर्ज या कार्यालयास वरील मुदतीत सादर करावा. शिक्षण उपसंचालकांची परवानगी प्राप्त झाल्याशिवाय इ. ५ वी सुरु केली जाणार नाही याची दक्षता घ्यावी.

(सही)
शिक्षणाधिकारी (माध्य)
जि.प.पुणे-११.

स्थळप्रतीवर मा. शि.अ. यांची स्वाक्षरी असे.

S/E/MIS/Pra-shi
001 /4/11/83.

महाराष्ट्र शासन.

क्रमांक: व्हिएलएस१०८३/५३४४१[सीआर]
९१
प्राशि-३

शिक्षण व सेवायोजन विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : 2 नोव्हेंबर, १९८३.

2 P

प्रति,

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे.

विषय :=सिध्देश्वर इंग्लिश मिडियम स्कूल, पुणे
परवानगी मिळणेबाबत.

भोसरी जिल्हा पुणे येथील सिध्देश्वर इंग्लिश मिडियम स्कूल या नांवाने सुरु असलेल्या प्राथमिक शालेस शासनाने घातलेली सर्वसाधारण बंदीची अट अंशत: शिथिल करुन अपवादात्मक परिस्थितीत "खास बाब" म्हणून कायम विना अनुदान तत्वावर खालील अटींच्या आधीन राहून शासन मंजूरी देत आहे.

१. नियमानुसार संस्था रजिस्टर्ड असली पाहिजे.

२. संस्थेने ही प्राथमिक शाळा कायम विना अनुदान तत्वावर चालविण्याची व भविष्यकाळात कधीही शासनाकडे अनुदानाची मागणी करणार नाही अशी लेखी संमती दिली पाहिजे.

३. संस्थेने शाळेचा एकूण शिक्षक वर्ग विहित वयोमर्यादित व प्रशिक्षित [एस. एस. सी. डी. एड. ] नेमलाच पाहिजे व त्यांना शासनाने ठरवून दिलेले वेतन व भत्ते दिले पाहिजेत.

४. संस्थेने शाळेसाठी स्वतंत्र व आधुनिक शैक्षणिक साहित्याने परिपूर्ण अशी स्वत:ची इमारत उपलब्ध केली पाहिजे.

५. शाळेतील प्रत्येक वर्गामध्ये शासनाने ठरवून दिलेली विद्यार्थी पटसंख्या व हजर संख्या असली पाहिजे.

६. संस्थेने जवळपासच्या शाळेवर आपल्या शाळेमुळे कोणताही दुष्परिणाम होणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे.

७. शासनाने वेळोवेळी दिलेल्या आदेशाचे संस्थेने पालन केलेच पाहिजे.

८. शाळेच्या फीचे दर शासनाने विहित केल्यानुसार असले पाहिजेत. त्यापेक्षा जादा फी घेता कामा नये.

..२/-

९. मुंबई प्राथमिक शिक्षण नियमावली १९४९ मधील विहीत अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

१०. नियमानुसार अनुसूचित जाती/जमातीच्या शिक्षकांचे प्रमाण भरलेच पाहिजे.

२. आपणास विनंती आहे की, वरील अटींची पूर्तता झाल्यानंतरच या-प्रकरणी नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही करावी व आपल्या कार्यपूर्ततेचा अहवाल शासनास यथावकाश पाठवावा.

[ बं० कों० व्यवहारे ]
सहाय्यक सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत :-

शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद, पुणे.
प्रशासनाधिकारी, नगर पालिका शिक्षण मंडळ, पुणे.
प्राचार्य, सिध्देश्वर इंग्लिश मिडियम स्कूल, भोसरी, पुणे.
यांचेकडे माहितीसाठी आणि नियमानुसार आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

देळुसकर/२११८३.

Fir2020-अ

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District** (जिल्हा): पिंपरी-चिंचवड **P.S.**(ठाणे): भोसरी **Year** (वर्ष): 2020

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0360 **Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 03/08/2020 19:30 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भारतीय दंड संहिता १८६० | 447 |
| 2 | भारतीय दंड संहिता १८६० | 448 |
| 3 | भारतीय दंड संहिता १८६० | 341 |
| 4 | भारतीय दंड संहिता १८६० | 143 |
| 5 | भारतीय दंड संहिता १८६० | 147 |
| 6 | भारतीय दंड संहिता १८६० | 149 |
| 7 | भारतीय दंड संहिता १८६० | 504 |
| 8 | भारतीय दंड संहिता १८६० | 506 |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): बुधवार

**Date From** (दिनांक पासून): 15/07/2020

**Date To** ( दिनांक पर्यंत): 15/07/2020

**Time Period** (कालावधी): पहर 7

**Time From** (वेळेपासून): 19:00 बजे

**Time To** (वेळेपर्यंत): 19:00 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

**Date** (दिनांक ): 03/08/2020 **Time** (वेळ): 19:30 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ

**Entry No.** (नोंद क्र.): 019 **Date & Time** (दिनांक आणि वेळ): 03/08/2020 19:30 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

1. (a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): दक्षिण, 4 किमी

**Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): श्री संगमेश्वर एज्युकेशन , ट्रस्ट चे सिध्देश्वर हायस्कुल,दिघी रोड, भोसरी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):

**District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** कामगोंडा बाळगोंडा पाटील

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1958 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | 19/5, शितलबाग सोसायटी, ,भोसरी, पुणे,भोसरी,पिंपरी-चिंचवड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | 19/5, शितलबाग सोसायटी, ,भोसरी, पुणे,भोसरी,पिंपरी-चिंचवड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-9518985126

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सुखदेवी शेषप्पा नाटेकर | | | 1. अटलास कलनी, महेश नगर,,नेहरु नगर जवळ, पिंपरी ,पिंपरी,पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र,भारत |
| 2 | संतोष शेषप्पा नाटेकर | | | 1. अटलास कलनी, महेश नगर,,नेहरु नगर जवळ, पिंपरी ,पिंपरी,पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र,भारत |
| 3 | आंबादास नाटेकर | | | 1. अटलास कलनी, महेश नगर, ,नेहरु नगर जवळ, पिंपरी ,भोसरी,पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र,भारत |
| 4 | दत्तात्रय लाडगे | | | 1. संत तुकाराम नगर, पाण्याचे , टाकीजवळ, भोसरी ,भोसरी,पिंपरी-चिंचवड,महाराष्ट्र,भारत |
| 5 | लक्ष्मी बिराजदार | | | 1. अटलास कलनी, महेश नगर,,नेहरु नगर जवळ, पिंपरी,पिंपरी,पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र,भारत |
| 6 | अनोळखी 1 | | | |
| 7 | अनोळखी 2 | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 8 | अनोळखी 3 | | | |
| 9 | अनोळखी 4 | | | |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11 **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

गु.र.नं.व कलम0360/2020, भा.दं.वि.कलम 447,448,341,143,147,149,504,506जबाब दिनांक : 03/08/2020मी कामगोंडा बाळगोंडा पाटील, वय 62 वर्षे, धंदा सेवानिवृत्त लिपीक व संगमेश्वर एज्युकेशन ट्रस्टचा सचिव, रा. 19/5, शितलबाग सोसायटी, भोसरी, पुणे मो.नं. 9518985126.समक्ष भोसरी पोलीस स्टेशन येथे हजर राहुन जबाब देतो की, मी वरील ठिकाणचा रहिवाशी असुन मी व संगमेश अंबाजी भैरगोंड यांनी मिळुन दिनांक 15/10/1979 रोजी संगमेश्वर एज्युकेशन ट्रस्ट भोसरी येथे स्थापण केली व सदर ट्रस्ट मार्फत सिध्देश्वर हायस्कुल, बालवाडी प्राथमिक, माध्यमिक स्थापन केली. व सदरच्या हायस्कुल मध्ये मी लिपीक म्हणुन व ट्रस्टचा सचिव म्हणुनही कार्य करत होतो. व आमचे ट्रस्टचे अध्यक्ष म्हणुन संगमेश अंबाजी भैरगोंड हे काम पाहत होते. सदरच्या ट्रस्टचे आर्थिक व्यवहार हे अध्यक्ष संगमेश अंबाजी भैरगोंड हे पाहत होते. तसेच त्यांच्या नावाची स्टेट बँक ऑफ इंडिया भोसरी शाखा येथे खाते आहे व त्याच खात्यावरुन ते संस्थेतील संपुर्ण आर्थिक व्यवहार, शिक्षकांचे पगार, संस्थेचा इतर शालेय खर्च, तसेच शाळेचे बांधकाम व इतर जो जो काही खर्च येईल तो सर्व खर्च सदरच्या खात्यामार्फत करत होते. आमच्या ट्रस्टच्या बडीवर अध्यक्ष संगमेश अंबाजी भैरगोंड, सचिव म्हणुन मी स्वत: व इतर सदस्य म्हणुन सौ, इंदिरा वालेकर, विजया नलगे, निलम आत्रे, ललित भैरगोंड व सन 2007 मध्ये सर्व कार्यकारणीच्या संमतीने शेषाप्पा नाटेकर यांना सदरच्या कार्यकारणीमध्ये सदस्य म्हणुन घेतेले होते. सदरची संस्थेची कार्यकारणी अस्तित्वात असताणा सदस्य शेषाप्पा नाटेकर यांनी ते ट्रस्टचे अध्यक्ष नसतानाही अध्यक्ष असल्याचे भासवुन संस्थेत दिनांक 10/07/2017 रोजी संस्थेच्या इतर सभासदांच्या खोटा व बनावट सह्यांचे संस्थेच्या कार्यकारणीचा बदल अर्ज व नविन सभासदाचा नियुक्ती अर्ज तयार करुन सदर अर्ज सहायक धर्मदाय आयुक्त, पुणे यांचेकडे मला व संस्थेच्या अध्यक्षास कसलीही माहिती न होऊ देता दाखल केला त्याचा बदल अर्ज क्रमांक 4627/2017 असा असुन तो एकतर्फी दिनांक 13/07/2017 रोजी सहा. धर्मदाय आयुक्त, पुणे यांचेकडुन मंजुर करुन घेतला. त्याबाबची माहिती मला व अध्यक्ष व इतर सदस्य यांना झाल्यावर आम्ही त्याबाबत आक्षेप अर्ज दि. 31/12/2017 रोजी सहा. धर्मादाय आयुक्त यांचेकडे दाखल केला व त्या आक्षेप अर्जावर दिनांक 17/03/2018 रोजी बदल अर्ज क्रमांक 4627/2017 वरील आदेश रद्द केला. सदर बदल अर्ज क्रमांक 4627/2017 मधील शेषाप्पा नाटेकर यांनी इतर सभासद यांच्या खोटा व बनावट सह्या करुन दाखल केलेला बदल अर्ज हा बनावट व खोटा असल्याने मी त्याविरुध्द न्यायालयात दिनांक 27/04/2018 रोजी प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पुणे यांचे न्यायालयात फिर्याद दाखल केली सदरच्या फिर्यादीवर न्यायालयाने सी.आर.पी.सी.चे कलम 156(3) नुसार शेषाप्पा नाटेकर यांचेविरुध्द भादवि कलम 420,468,471,472,406 नुसार गुन्हा नोंद करुन तपास करण्याबाबत आदेश केला. त्या आदेशानुसार कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन येथे 15/2018 भादवि कलम 420,468,471,472,406 नुसार दाखल असुन त्याचा तपास चालु आहे. तपासादरम्यान यातील मुख्य आरोपी शेषप्पा नाटेकर हे माहे जुन 2019 मध्ये मयत झाले. आमच्या संस्थेचे अध्यक्ष संगमेश अंबाजी भैरगोंड 14/06/2020 रोजी मयत झाले त्यानंतर सर्व सभासदांचा ठराव होवुन ललीत संगमेश भैरगोंड हे अध्यक्ष झाले. काही दिवसांनी ललीत भैरगोंड हे इंग्लंड येथे त्यांचे नोकरीचे ठिकाणी गेल्यानंतर संस्थेचा सचिव व उपाध्यक्ष म्हणुन संस्थेचा तात्पुरत्या स्वरुपात कार्यभार मी स्वत: पाहत होतो. व अध्यक्ष मयत झाले तर त्यांचे वतीने संस्थेचा कार्यभार पाहणेबाबत 1979 रोजी ठराव होऊन त्या ठरावाची नोंद संस्थेच्या प्रोसिडिंग बुकात नोंदविलेली आहे. त्यानंतर 01 जुन ते 06 जुन 2020 च्या दरम्यान मयत शेषप्पा नाटेकर यांची मुलगी लक्ष्मी बिराजदार व इतर शाळेतील काही शिक्षक यांनी स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा, भोसरी येथे जाऊन सिध्देश्वर हायस्कुलचे नावे असलेले खाते बंद करुन त्यांच्या नावे नविन खाते व ते चालविण्याचे अधिकार लक्ष्मी बिराजदार हिचेकडे घेण्याबाबत बँकेत जावुन तेथील मनेजर यांना विचारणा केली असता मनेजर अभिशेक गौतम सोनी यांनी सर्व संचालक मंडळाचे लेखी परवानगीशिवाय तुम्हाला खाते बदलता येणार नाही असे सांगीतले व या बाबत मला फोन करून सर्व हकीगत सांगीतली.दिनांक 25/07/2020 रोजी सायंकाळी 07.00 वा. चे सुमारास कोरोना विषाणुचे प्रादुर्भावाकारणाने शाळा बंद असताना व संस्थेचा वचमन नामे आसदखान आवटी हे जेवण करण्यासाठी गेले असता मयत शेषप्पा नाटेकर यांचे नातेवाईक सुखदेवी शेषप्पा नाटेकर, संतोष शेषप्पा नाटेकर, आंबादास नाटेकर तसेच आमच्या संस्थेमधुन निष्कासीत केलेले शिक्षक दत्तात्रय लांडगे व लक्ष्मी बिराजदार व त्यांचेसोबत इतर तीन चार लोक हे सर्व संस्थेशी काहीएक संबंध नसताना व मयत शेषप्पा नाटेकर यांनी बदल अर्ज क्र. 4627/2017 हा सहा.धर्मदाय आयुक्त,पुणे यांनी दिनांक 17/03/2018 रोजी रद्द केला असतानाही संस्थेच्या कार्यालयाचे इमारतीत जबरदस्तीने घुसुन कार्यालयाचा ताबा घेतला, तेव्हा आम्ही त्यांना समजावुन सांगण्यासाठी गेलो की, आमची कमीटी कोर्टाने ग्राह्य मानली आहे, तुम्हाला काही आक्षेप असेल तर तुम्ही मा. कोर्टात दाद मागु शकता अशा प्रकारे विनवणी केली असता सुखदेवी शेषप्पा नाटेकर, संतोष शेषप्पा नाटेकर यांनी आम्हांस संस्थेत पुन्हा आला तर तुम्हाला जिवंत सोडणार नाही अशी धमकी देवुन शिवीगाळ केली. मी आज पर्यंत त्यांना सदर संस्थेचा ताबा सोडा त्यावर आमचा अधिकार आहे असे सांगुन विनवणी करीत होतो परंतु

त्यांनी आमचे म्हणने आजपर्यंत न ऐकल्याने आज रोजी मी पोलीस स्टेशन येथे येऊन तक्रार देत आहे.माझा वरील जबाब संगणकावर टंकलिखीत करण्यात आला असुन तो मी वाचुन पाहिला तो माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरा आहे. समक्ष,हा जबाब दिला स.ता.म., पोलीस उप निरीक्षक,भोसरी पोलीस स्टेशन, पिं.चिं.

**13. Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): anirudha mahadev savrde
**Rank** (पद): SI (Sub-Inspector)
**No.**(क्र.): psi **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15. Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): shankar vaman avatade
**Rank** (पद): I (Inspector)
**No.** (सं.): pi

भोसरी पोलीस स्टेशन
पिंपरी चिंचवड शहर

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):
**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /**
(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| **S.No.**(अ.क्र.) | **Sex** (लिंग) | **Date/Year of Birth** (जन्म | **Build** (बांधा) | **Height (cms.)** (उंची | **Complexion** (रंग) | **Identification Mark(s)** (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| **1** | **2** | **3** | **4** | **5** | **6** | **7** |
| 1 | महिला | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 3 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 4 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 5 | महिला | | | | | चेचक के दाग: NO |
| 6 | | | | | | चेचक के दाग: NO |
| 7 | | | | | | चेचक के दाग: NO |
| 8 | | | | | | चेचक के दाग: NO |
| 9 | | | | | | चेचक के दाग: NO |

| **Deformities/ Peculiarities** | **Teeth** (दात) | **Hair** (केस) | **Eyes** (डोळे) | **Habit(s)** (सवयी) | **Dress Habit(s)** (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| **8** | **9** | **10** | **11** | **12** | **13** |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)

भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये Rs. 100

रु. 100 ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2023 ◐ 83AA 749760

12 JAN 2024

अनु. क्रं. २४६६ दि. मु.शु.रक्कम १००

दस्ताचा प्रकार प्रतिज्ञापत्र

दस्त नोंदणी करणारा आहेत का ? होय / नाही.

मिळकतीचे वर्णन

मुद्रांक विकत घेणाऱ्याचे नांव सिध्देश्वर हायस्कूल

पत्ता दिघी रोड भोसरी पुणे ३९

दुसऱ्या पक्षकाराचे नांव

हस्ते व्यक्तीचे नांव व पत्ता

मुद्रांक विकत घेणाऱ्याची सही

वैशाली राम हिंगमीरे
परवाना क्र २२०१०५६
पुणे-नाशिक रोड, भोसरी, पुणे-३९

ज्या कारणासाठी ज्यांनी मुद्रांक खरेदी केला त्यांनी त्याच कारणासाठी मुद्रांक खरेदी केल्यापासुन ६ महिन्यात वापरणे बंधनकारक आहे.

वरिष्ठ कोषागार अधिकारी पुणे

03 JAN 2024

प्रथम मुद्रांक लिपीक कोषागार पुणे करिता

PRINCIPAL
Siddheshwar English Medium School

## –:प्रतिज्ञापत्र:–

मी **सौ. सुजाता सावंत** मुख्याध्यापक म्हणून **सिध्देश्वर इंग्लिश मेडियम हायस्कूल** या शाळेचा पूर्ण पत्ता **दिघी रोड, भोसरी, हरी ओम स्विट मार्ट शेजारी** या ठिकाणी कार्यरत असून सत्य प्रतिज्ञेवर करते की मी,

मी वरील ठिकाणी कार्यकर असून सिध्दे हायस्कूल, दिघी रोड, भोसरी, पुणे ता. हवेली, पुणे ३९ आमच्या विद्यालयात **दि. ०५/०९/२०२२** रोजी चोरी झाली. त्यात शाळेची संबंधीत सर्व मुळ कागदपत्रे चोरी झाली आहेत. या संबंधी पोलीस स्टेशनला **दि.** ०६/०९/२०२२ रोजी तक्राद देखील करण्यात आली. तरी त्या कागदपत्रांची झेरॉक्स प्रत आम्ही सादर करीत आहोत याची सर्व जबाबदारी शाळेची राहील याची मी हमी देत आहे. याच्या सत्यतेसाठी सदरचे प्रतिज्ञापत्र करत आहे.

वरील माहिती सत्य असलेप्रमाणे आम्ही सदरचे हमीपत्र सादर करीत आहोत.

S.Sawant

| | |
|---|---|
| सिध्देश्वर हायस्कूल | सिध्देश्वर हायस्कूल |
| मुख्याध्यापिका | संचालक |

PRINCIPAL
Sidheshwar English Medium School
(Primary-Section)
Dighi Road, Bhosari, Pune-39.